**अन्विक्षा-नि-प्रात्यक्षिक प्रक्षेत्र योजनेतर योजना (२७०२ १९३३)**
**१०० टक्के राज्य पुरस्कृत योजना**
**सन २०१६-१७ मध्ये राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना**

अन्विक्षा नि प्रात्यक्षिक प्रक्षेत्रावरुन परिसरातील शेतक-यांना बागायत पिकांचे नविन तंत्रज्ञानाचे वेळोवेळी मार्गदर्शन करणे व प्रशिक्षण देणे तसेच प्रक्षेत्रावर नविन वाणाची प्रात्यक्षिके आयोजित करुन नविन तंत्रज्ञानाचा शेतक-यापर्यंत प्रचार व प्रसार करणे हा अन्विक्षा नि प्रात्याक्षिक प्रक्षेत्राचा मुळ उद्येश आहे. या योजनेत (२७०२ १९३३) या लेखाशीर्षाखाली फक्त मजूरी या घटकाचा समावेश आहे. मजूरी या घटकासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

शासन निर्णय क्र. असंक-१००/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा , दिनांक १० सप्टेंबर, २००१ अन्वये परिच्छेद क्र. २.१०. (२) नुसार सध्या विशिष्ट प्रकारच्या कामांसाठी काही विभागांमध्ये अल्पावधीसाठी हंगामी जागा वेळोवेळी निर्माण केल्या जातात. उदाहरणार्थ- शासकीय बीज गुणन प्रक्षेत्रावर (सीड फार्म) हंगामी शेतीकामासाठी नेमलेले कामगार.

**यापुढे हंगामी पदे निर्माण करु नयेत व ती भरण्यात येऊ नयेत. हंगामी स्वरुपाची कामे ज्या विभागांकडून सध्या केली जातात ती यापुढे कंत्राटीपध्दतीवर करुन घेण्यात यावीत. हंगामी व रोजंदारी कर्मचारी नेमण्यात येवू नयेत.**

अशा स्पष्ट सूचना आहेत. त्यामुळे मजूरी या घटकासाठी वरीलप्रमाणे कार्यपध्दती वापरण्यात यावी.

मा.संचालक (नि.व गुनि) यांचे मान्यतेने

कृषि संचालक (नि.व गुनि)
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे करीता

------------------oooooooo---------------

जा.क्र/गुनि१/२/अनिप्रा/मासु१६-१७/१९५/२०१६
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
दिनांक : ०२/०७/२०१६

प्रति,

विभागीय कृषि सहसंचालक -------------------- (सर्व)
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ------------------(सर्व)

Scanned by CamScanner